# पर्यावरण संवर्धनात वंदना शिवाचे योगदान

**प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे**
इतिहास विभाग प्रमुख
रा.तु. महाविद्यालय, चिमूर, जि. चंद्रपूर
Mob.No. ९६८९९५२८७३
Email ID– rajurwadep९@gmail.com

**Abstract :**

स्त्री आणि पर्यावरणाचे जवळचे नाते आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि नैसर्गिक स्त्रोतांची राखण करण्याची जबाबदारी आणि क्षमता स्त्रियांचीच आहे. विशेषतः भूमिची सूफलनक्षमता आणि स्त्रीची सर्जनशीलता यातील सार्धम्य आपल्या प्राचीन समहाला जाणवले होते. अगदी सणांच्या योजना करण्यापासून कृषी व त्यांच्याशी निगडीत भूमीच्या तीन मुख्य रूपांची कल्पना लोकसंस्कृतीने केली. तशाच पद्धतीने स्त्रियांच्याही तिन अवस्था आहेत. जमिनीतील कापणी झाल्यानंतरचा विश्रांती काळ आणि याच काळात विवाहसंस्कार न करण्याचा प्रधान यातून अधोरेखित होते. परंतु पर्यावरणीय सहारांच्या पाश्र्वभूमीवर जगणा-या स्त्रिया आणि नैसर्गिक स्त्रोतांशी ती मग जमीन असो, पाणी किंवा जंगले असोत यात बदलत जाणारे घटक परिणाम वैविध्य घटण्यात आला आणि पर्यायाने स्त्रीचे ज्ञान तिचे अधिकार आणि पर्यायाने समाजातील तिचे पद घटविण्यास मदत होते. भारतात इको फेमानिझम चळवळ त्या अर्थाने भरतात. वंदना शिवा, सुनिता नारायण, सी.के. जानू यांनी विलक्षण काम केले आहे.

पर्यावरण रक्षण आणि संवर्धन हे आव्हान महिला शक्ती समर्थपणे पेलू शकते. जून १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे विश्व पर्यावरण परिषद आयोजित केली होती. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या परिषदेत भाषण करताना म्हटले, "दारिद्र्य हा सर्वात घातक प्रदुषक आहे." पर्यावरण रक्षणासबंधी त्या दारिद्र्यांचे निवारणाचे महत्व सागतात. याच परिषदेतील जेष्ठ विचारवंत बार्बाश वॉर्ड म्हणतात की, "पर्यावरण ही मानवतेपासून संपूर्ण फारकत असलेली अगदी वेगळा भाग आहे असे स्कॅ स्टॉकहोम परिषदेपूर्वी वाटायचे, परंतु स्टॉकहोममुळे पर्यावरण विचारात मुलभूत बदल घडून आला आहे."

**पर्यावरणीय स्त्रीवाद :**

पर्यावरणीय स्त्रीवाद किवा स्त्रीवादी पर्यावरणवाद ह्या संकल्पना पर्यावरणाविषयीच्या आणि स्त्रीवादी चळवळींना जोडणारा दुवा आहे. ह्या एकत्रित चळवळीद्वारे समाजातील फक्त स्त्रियांवर होणा-या अन्यायालाच वाचर फोडली जाते असेच नव्हे तर समाजातील सर्वच

 Copyright © 2020 Authors

प्रकारच्या शोषणांना विरोध करून त्यांचे निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न केले जाते. १९७४ साली फ्रान्सची लेखिका फेन्कोईज डिबोने यांनी फेमिनेजम औला मोर्ट नावाचे पुस्तक लिहिले. त्यात फेमिनिझम पर्यावरणवाद या संकल्पनेचा वापर केला आहे. या पुस्तकांत गृहित धरले आहे की, स्त्रियांच्या शोषणाच्या पद्धती आणि निसर्गाच्या शोषणाच्या पद्धतीमध्ये साम्य आहे. निसर्गातील प्राणी, जमिन, प्राणी आणि वायू ह्या गटांच्या शोषणामध्येही वर्चस्ववादी गटाकडून वापरले जात. निसर्गातील सहयोग, सर्जनशिलता, देवाण-घेवाण जे निसर्गात असते ते स्त्रियांमध्ये समानरित्या अस्तित्वात असते. हा इको फेमिनिझम विचार समाजवादी दृष्टीकोन, सामाजिक पर्यावरणाकडे जाताना दिसतो. स्त्रिया व भूमिही सारखेच काम करतात. निसर्गातील अनेक गोष्टी स्त्रिया शिकल्या आहेत. स्त्रियांच्या पारंपारिक कौशल्याचा उपयोग केला जातो.

पर्यावरण व्यवस्थापन ही मानव आणि निसर्ग यांच्यात समन्वय साधणारी प्रक्रिया आहे. पर्यावरणाची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत आहे. वाढती लाकसंख्या, वाढते औद्योगिकरण, बदललेली जीवनशैली, नैसर्गिक साधनांचा मर्यादेबाहेर वार, मनुष्याची बेफीकीर वृत्ती, त्यामुळे जल, वायू, ध्वनी, अंतराळ व भूमी इत्यादींचे प्रदूषण आणि इतर पर्यावरणीय समस्या यांनी जगभर गंभीर स्वरूप धारण केले आहे. त्यामुळे सजीवांचे व पर्यायाने मानवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

**पर्यावरण व महिला :**

(१) पर्यावरण व पर्यावरणाची आव्हाने या विषयीचे आकलन व ज्ञान महिलांना जास्त असते.

(२) पर्यावरणीय समस्या कमी करण्यासाठी त्यांच्याकडे कौश्यल्ये असते.

(३) पर्यावरणीय कार्यक्रमात उपलब्ध ज्ञानाचा महिला वापर करतात.

**डॉ. वंदना शिवा :**

वंदना शिवा यांचा जन्म ५ नोव्हेंबर १९५२ ला डेहराडून, उत्तराखंड येथे झाला. या भारतीय तत्वज्ञ, पर्यावरणवादी लेखिका आहेत. त्यांनी २० हून जास्त पुस्तके लिहिली. २०१० मध्ये सिडनी सरकारने शांतता पुरस्काराने सन्मानीत केले आहेत. १९७० च्या दशकात वंदना शिवा यांनी अहिंसात्मक चिपको आंदोलनात भाग घेतला. झाडांची तोड थांबविण्यासाठी झाडाला मिठी मारून महिला उभ्या राहत व झाडांचे संरक्षण केले. वंदना शिवा या जेरी मॅंडर, एडवर्ड गोलुरस्मीथ, रॉल्फ नॅडर इत्यादीसोबत जागतिकीकरणाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय फोरमच्या नेत्यामध्ये आले आहे. जागतिकीकरणामध्ये परिवर्तन घडवा (आल्स्टर ग्लोबलायझेशन मूव्हमेंट) हे एका जागतिक एकात्मता आंदोलनाचे नाव आहे. त्यांनी अनेक परंपरागत पद्धती वैज्ञानिक स्वरूपात साद केल्या आहेत.

 Copyright © 2020 Authors

सेंद्रिय शेतीची चळवळ उभारणा-या व पर्यावरण रक्षणासाठी भरीव कार्य देणा-या अशी डॉ. वंदना शिवा यांची ओळख आहे. पर्यावरणाच्या क्षेत्रात स्त्रियांचा आदिशक्ती विरोधात घाला घातला आहे. चिपको आंदोलनात महिला व पर्यावरणांची चर्चा त्यात झाली नाही. देशाच्या पर्यावरण रक्षणात आणि वाटचालीत डॉ. वंदना शिवा यांनी महत्वाचे कार्य केले.

वंदना शिवा यांनी बघितले की, रसायनिक शेतीचा प्रयोग करून लोक शेतजमिनीचे मोठे नुकसान करीत होते. आपली देशी कृषी वाणे टिकली पाहिजेत यासाठी त्यांनी नवधान्य ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या वतीने शेतक-यांना प्रशिक्षण देणे सेंद्रिय शेतीचा प्रचार-प्रसार करणे, पारंपारिक वाण टिकविणे त्यात वाढ करणे, अशी कामे सुरू झाली. आजवर या संस्थेने पाच लाख शेतक-यांशी संपर्क झाला आहे. भारतातील तीन हजारांहून अधिक तांदळाच्या वाणांचे संवर्धन करण्यात त्यांच्या संस्थेला यश आले आहे. भारतातील १६ राज्यामध्ये ६० बियाणांच्या बँका (सीड बँक) उभारण्यात आल्या आहेत. याचाच पुढचा भाग म्हणून डॉ. वंदना शिवा यांनी बिज विद्यापीठाची स्थापना केली. त्यामुळे देशी वाण टिकविण्याचे त्यांचे कार्य मौलाचा ठरला.

रासायनिक शेतीनंतर डॉ. वंदना शिवा यांनी गोल्डन राईसला (सानेरी तांदुळ) यास प्रखर केला. या तांदळाची लागवड हाणून पडते हे सारेच चक्रावून टाकणारी या तांदळाच्या वाणामुळे होणारे परिणाम, अन्नातून मिळणारे पोषणमूल्ये या सा-यावर त्यांनी जीएम वाहनाचे रक्षण करण्यासाठी प्रयत्न केले.

वंदना शिवा यांनी विविध यपद्दक पुस्तकाचे लेखन, पत्रकार परिषदेमधून विविध माध्यमातून सेंद्रिय शेतीचे प्रचार व प्रसार केले आहे. पर्यावरणपूरक रसायनाचा वापर टाळून पर्यावरणाचे जनप्रबोधन केले आहे. निंब, बासमती आणि गहू या सारख्या पर्यावरणपुरक लोक चळवळीचे काम त्यांनी केले आहे.

वंदना शिवा म्हणतात की, “पर्यावरणाचे हित जपुणच आपण विकासाचा मार्ग चोखाळला पाहिजे. शाश्वत विकासासाठी हे आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रसायनाचा वापर करणे हे विनाशाकडे नेणारे आहे.” एका मुलाखतीत सांगतात की, “पर्यावरण हा निसर्गाचा एक अमूल्य घटक आहे. त्यांच्या सहवासात आपण जगले पाहिजे. आनंद घेतला पाहिजे. पर्यावरण नसले तर आपले जीवनही निरस बनेल.”

पर्यावरणास स्वच्छ/हिरवे बनविण्याचा प्रयत्न वंदना शिवा करीत आहे. फेमिना या जगप्रसिद्ध मासिकांनी सुद्धा प्रसिद्ध पर्यावरणतज्ञ म्हणून गौरविले आहे. टाईम मॅगझीनने त्यांना ‘इन्वायरमेंटरल हिरो’ही पदवी देऊन गौरान्वीत केले आहे. त्या म्हणतात की, देशाचा विकास करीत असताना मानवी मूल्ये/निसर्गाचा समतोल सांभाळने गरजेचे आहे.

 Copyright © 2020 Authors

वंदना शिवाचे व्यक्तिमत्व बहुआयामी आहे. नोबेल पारितोषीकाइतकाच 'राईट लाईव्हलिहूड अवॉर्ड १९९३ ला मिळाला.

जैवतंत्रज्ञान, जैवनिती आणि जतुकीय अभियांत्रिकी आणि भारतीय शेती परंपरांचा या विषयांचा सांगोपांग अभ्यास असल्यामुळे त्यांची मते स्पष्ट आणि निर्भिड आहेत. त्यांचा शेतीतील तथाकथित प्रगत तंत्रज्ञानास त्यांचा ठाम विरोध आहे. कंपन्या शेतक-यांच्या बिजसत्ता नष्ट करीत आहे. जनुकीय बदलातून झालेल्या पिकांना त्यांचा कडाडून विरोध झाला. शेतक-यांच्या आत्महत्या, भूकबळी, उपोषण शेतकरी कर्जबाजारी हे सर्व तथाकथित प्रगत शेतीचे परिणाम आहेत.

१९८४ मध्ये पंजाबमध्ये उसळलेली दंगल आणि भोपाळचे युनियन दंगल या घटना त्यांच्या कामाची स्वातंत्र घटना केली पाहिजे. भूतान भारत देशाला १०० टक्के सेंद्रिय करण्यासाठी त्यांनी अनेक प्रयोग केले.

हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानाच्या नव्या पद्धतीने विचार करण्याची विचार भासू लागली आहे. रासायनिक शेतीला खूप पाणी लागते. पिकाच्या उत्पादकेबरोबर आरोग्यावर परिणाम पडते. पाण्याचा प्रश्न हा प्रामुख्याने गरीबी दूर करण्याचा निसर्ग आणि मानव यात समतोल करण्याचा प्रयत्न आहे. निसर्गाचा नाश होतो, अमर्यादित उर्जा वापरल्यामुळे होतो. नैसर्गिक संसाधनाच्या बाबतीत बेताले वापराबद्दलची खोलवर पोहचणारी जाणीव केवळ अपराधी भावना नाहीत तर प्राधान्यक्रम ठरवून देता येईल. पर्यावरण संवर्धनाची भूमिका घेत राहणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

**संदर्भ सूची :**

(१) मगर जयेशकुमार, मराठी विश्वकोष

(२) पारेकर दशरथ, वसुंधरेचे शत्रू आम्ही, तेजस प्रकाशन, कोल्हापूर

(३) कोटलवार अतुल, पर्यावरण व परिस्थिती, स्पर्धा परिक्षा विषयक बुक्स, ४ युनिक अॅकेडमी

(४) बिसेन देवेंद्र, हवामनशास्त्र, साई ज्योती पब्लिकेशन्स

(५) गंगणे वर्षा, पर्यावरणविषयक, साई ज्योती प्रकाशन, नागपूर

(६) महाजन श्री.द., वेल महावेल, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

(७) साळवे कल्पना, पर्यावरण संवर्धन, स्वरमहिमा प्रकाशन

(८) ससाने मनोहर, पर्यावरणम, सानिया प्रकाशन

 Copyright © 2020 Authors